# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ मार्च, २०२३ / फाल्गुन १८, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

### कांदिवली (मुंबई) येथून भेसळयुक्त दुधसाठा जप्त केल्याबाबत

**(१) * ५६८५१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथे अन्न आणि औषध प्रशासनाने दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाच ठिकाणी छापे टाकून १०६४ लिटर भेसळयुक्त दूधसाठा जप्त करुन नष्ट केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने दुध भेसळ रोखणे व दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस प्रशासनाने ०५ इसमांविरुध्द समतानगर पोलीस ठाणे, कांदिवली पूर्व येथे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ०५ आरोपींना पोलिसांमार्फत अटक करण्यात आलेली आहे.सदर प्रकरणी अटक करण्यात आलेल्या व्यक्तींवर पोलीस प्रशासनामार्फत पुढील न्यायालयीन कार्यवाही घेण्यात येत आहे.

दुधात भेसळ होऊ नये म्हणून अन्न व औषध प्रशासनामार्फत विविध ठिकाणी नियमित धाडी टाकून व दुधाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून प्राप्त विश्लेषणाच्या अहवालाचे अनुषंगे कायदेशीर कार्यवाही संबंधितांवर घेण्यात येते.

बृहन्मुंबई विभागामध्ये दुधाच्या पिशव्या टॅम्परिंग करून होणाऱ्या भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी झोपडपट्टी मोहिम राबवून संबंधित व्यक्ती विरुध्द गुन्हे नोंदविले जातात. मुंबई शहरामध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी “नाका मोहिम” राबविण्यात येते. सदर नाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दूध कमी दर्जाचे आढळल्यास त्याची कायदेशीररित्या विल्हेवाट केली जाते. धाडी जप्तीची कारवाई घेऊन दूध भेसळीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती येथील सातुर्णा औद्योगिक वसाहतीचा भूखंड विक्री करताना झालेली अनियमितता**

**(२) * ५७२५३ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने अमरावती शहरात उद्योगास वाव मिळावा म्हणून सातुर्णा येथे आद्योगिक वसाहत सहकारी संस्था स्थापन करुन संस्थेला शहरातील सर्वे न. १२ आणि १३ असे मिळून २६ एकर १५ गुंठे एवढी जमीन दिली असून या २६ एकर जागेवर विविध आकाराचे १४७ प्लॉटस उद्योजकांना उद्योगासाठी देण्यात आले असून या औद्योगिक क्षेत्रात १४७ पैकी ६८ उद्योग सुरू असून यापैकी ३१ उद्योग बंद असून १ लाख ४० हजार चौरस फुट जागा शहरातील प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने वनीकरणास राखीव ठेवण्याच्या अटीवर संबंधीत संस्थेस लिजवर देण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक वसाहत सहकारी संस्था र.न. ८४१५/१९६१ सातुर्णा, जि.अमरावती या संस्थेच्या औद्योगिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या ५७ हजार ६५२ चौरस फुटाच्या जागेचे आरक्षण कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पुर्ण न करता बदलून वाणिज्यिक वापरासाठी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक सहकारी संस्थेत एकूण प्लॉटसपैकी १३ टक्के प्लॉट्स अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव असताना संस्थेने ते खुल्या प्रवर्गातील उद्योजकांना हस्तांतरित केल्यामुळे संस्थेतील आरक्षण संपुष्टात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जागेवर २ लाख चौ.फुट बांधकाम करण्यासाठी संस्थेने मागविलेल्या निविदेत केवळ एकाच बांधकाम व्यावसायिकाने दोन निविदा भरल्यामुळे कोणत्याही स्पर्धेविना त्याच व्यावसायिकाची निविदा मंजूर झाली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बाजारभावाप्रमाणे ६० कोटी मुल्य असलेल्या २ लाख चौ.फुट जागेच्या मोबदल्यात संस्थेला व्यावसायिक केवळ १२ कोटी रुपये मुल्याचे ८० हजार चौ.फुट बांधकाम सुपूर्द करणार असून उर्वरित १ लाख २० हजार चौ.फुट बांधकाम मालकीहक्काने विकण्यात येणार असून त्यात व्यावसायिकाला जवळजवळ २४० कोटी रुपयांचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे दिनांक ०९/०४/१९५८ च्या आदेशान्वये ई-क्लास जमीन औद्योगिक प्रयोजनार्थ हस्तांतरीत करण्यात आली. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २०/११/१९८६ रोजी (१६ एकर ३८ गुंठे) सर्व्हे नं.१२ जागा औद्योगिक वसाहत सहकारी संस्था लि. अमरावती यांना लीजद्वारे ९० वर्षाकरीता हस्तांतरीत केली आहे. तसेच महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांनी दिनांक १९/१०/१९८८ रोजी (९ एकर १८ गुंठे) सर्व्हे नं.१३ जागा सदर औद्योगिक वसाहतीत लीजद्वारे ९० वर्षाकरीता देण्यात आलेली आहे. सदर जागेवर विविध आकाराचे १४८ प्लॉट्स उद्योजकांना देण्यात आले असून सध्या ६८ उद्योग घटक सुरु असून त्यासाठी ९८ प्लॉटस वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच ३१ उद्योग घटक बंद असून त्याकरीता ४४ प्लॉट्स वाटप करण्यात आले आहेत. या औद्योगिक वसाहतीमध्ये सदर संस्थेने १,१८,२३८ चौ.फु. जागा खुली जागा म्हणून राखीव ठेवलेली आहे व एकूण ८६,९४५ चौ.फु. जागेवर वृक्ष लागवड केलेली आहे.

(२) सदर औद्योगिक संस्थेने सातुर्णा येथील सिट क्र.१६ भुखंड क्र.६९२ क्षेत्रफळ ५३५६.३२ चौ.मी. सत्ताप्रकार भोगवटदार वर्ग-२ चे भोगवटदार वर्ग-१ करुन मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक ०९/०३/२०२२ ला अर्ज सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार, अमरावती यांनी दिनांक ०५/०४/२०२२ च्या आदेशानुसार सदर क्षेत्रफळ भोगवटदार वर्ग-१ झालेले आहे व तशी नोंद आखीव पत्रीका व सात-बारा मध्ये घेण्यात आली आहे.

(३) सदर औद्योगिक वसाहत संस्थेत सन १९९५ ते २००० या कालावधीत १३ टक्के प्रमाणे १९ भुखंड अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकास वाटप केलेले होते. तद्नंतर त्यातील ८ उद्योजकांनी त्यांचे भुखंड इतर उद्योजकास हस्तांतरीत केले असल्याचे संस्थेने कळविलेले आहे. सद्यस्थितीत ५ भुखंड अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांच्या ताब्यात आहेत.

(४) तहसिलदार, अमरावती यांनी सदर जागेचा सत्ताप्रकार वर्ग-२ वरुन वर्ग-१ केलेला आहे. सदर औद्योगिक संस्थेने सत्ताप्रकार वर्ग-१ असल्याने संस्थेचे पत्रानुसार सदर जागेवर व्यावसायिक कामाकरीता निविदा प्रक्रिया काढल्याचे कळविले आहे. या निविदा प्रक्रियेस आमसभेत मंजूरी घेण्यात आली, परंतु निवड केलेल्या विकासकास कोणतेही आदेश निर्गमित केलेले नाही.

(५) सदर जागेचे विकासकास कामाचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाही. तसेच जागा हस्तांतरण किंवा विक्री करण्यात आलेली नाही. त्यामुळे विकासकास २४० कोटी रुपयांचा फायदा झाला असे म्हणता येणार नाही.

(६) संबंधित विषयाबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेला पत्र देऊन तक्रारीबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे व पुढील विकास बांधकाम कार्यवाहीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेद्वारे तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे. संस्थेने सादर केलेल्या खुलाशानुसार सदर जागा विकासकास हस्तांतरीत किंवा विक्री केलेली नाही. त्याचप्रमाणे सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे विकास कामे झालेली नाहीत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील बाल विद्यामंदिर हायस्कूल या शाळेतील एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असणारी शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(३) * ५७९८० डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिक दुर्बल घटकातील बुध्दीमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक सहाय्य करण्यासाठी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी येथील बाल विद्यामंदिर हायस्कूल या शाळेतील एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये त्यांना अनुज्ञेय असणारी रक्कम मागील ४ वर्षापासून जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी थकीत शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावी अशी मागणी मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना थकीत शिष्यवृत्ती मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर शिष्यवृत्ती ही केंद्रशासनाकडून देण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे

(४) मुख्याध्यापकांनी केलेल्या अर्जाबाबत बाल विद्यामंदीर हायस्कुल, परभणी या शालेतील एकुण ३ विद्यार्थ्यांचे एनएसपी पोर्टलवरील ऑनलाईन अर्जांची पडताळणी करण्यात आली असून त्यांची शिष्यवृत्ती मिळण्याबाबत केंद्रशासनास पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

----------------

**चेक बोरगाव (ता.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा**

**(४) * ६२१०६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या चेक बोरगाव जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी पालकांना पूर्वसूचना न देता खराळपेठ येथील उत्तमराव पाटील वनउद्यानात दिलेल्या खाद्यांन्नामधून अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनासआले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषबाधा प्रकरणी मा.पालकमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई तसेच विषबाधित विद्यार्थ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्राप्त वैद्यकीय अहवालानुसार १२ विद्यार्थ्यांच्या Dignosis या रकान्यामध्ये Acute Gastritis due to Chicken consumption चे निदान करण्यात आले आहे.

सदर विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाताळा (जि.चंद्रपूर) एमआयडीसीतील एम.एम-५ या भुखंडाबाबत**

**(५) * ६०८८० श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूरच्या दाताळा एमआयडीसीतील ४८० भूखंडापैकी १८८ भूखंड अद्यापही रिकामे असतांना मूलभुत सुविधांसाठी राखीव असलेला प्लॉट नंबर एमएम-५ चे व्यावसायिक भूखंडात रुपांतर करुन तो नागपूर येथील आर्या ऑटीव्हील या कंपनीला अत्यल्प दरात विकण्यात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पडोली-घुग्गूस मार्गावर असून कोटयवधीचा भूखंड फक्त ४०० रुपये स्क्वेअर मीटर दराने विकून यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरुदध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. एएम-५ मधून ६००० चौ.मी. जागेच्या मागणी संदर्भात मऔवि महामंडळाच्या Minor Modification Committee (MMC) मंजूरीनुसार औद्योगिक भूखंडात रुंपातरीत करण्यात आले आहे.

मऔवि महामंडळाच्या दि. ०६/०५/२०२२ रोजीच्या भूखंड वाटप समितीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार मे. आर्या ऑटोव्हील प्रा.लि. यांना दि. ०३/०६/२०२२ रोजी भूखंड क्र. ए-८ आराजी ५०२५ चौ.मी. चे वाटप मऔवि महामंडळाच्या प्रचलित दरानुसार औद्योगिक वापरासाठी करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयात आधारभूत धान खरेदीला मुदतवाढ देण्याबाबत**

**(६) * ६१५५१ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात आधारभूत किंमत खरेदीला शासनाने मुदतवाढ दिली नसल्यामुळे जिल्हयातील पणन महासंघाची धान खरेदी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांकडे सुमारे १५ लाख क्विंटल धान असून मुदतवाढ न मिळाल्यास शेतकऱ्यांना कमी किंमतीत व्यापाऱ्यांना धान विकावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान खरेदीची मुदत आणि उद्दिष्ट वाढविण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात येऊन त्यावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने ११ हजार ७४५ शेतकरी धान विक्रीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धान खरेदीची मुदत आणि उद्दिष्ट वाढविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये धान खरेदीसाठी प्रथम दि.१९.१०.२०२२ ते दि.३१.०१.२०२३ असा कालावधी निश्चित करण्यात आला होता. तदनंतर तीन टप्प्यात दि.१५.०२.२०२३, दि.२८.०२.२०२३ व आता दि.०८.०३.२०२३ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये भंडारा जिल्ह्याकरीता धान खरेदीसाठी प्रथम ४१,८८,४६८ क्विंटल उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये वाढ करुन ४३,२०,००० क्विंटल उद्दिष्ट देण्यात आले आहे.

तसेच भंडारा जिल्ह्यात खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये धान खरेदीसाठी १,२६,९८८ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, दि.०२.०३.२०२३ पर्यंत १,१८,६६३ शेतकऱ्यांकडून ४२,३०,२९३.९२ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली असून अद्याप धान खरेदी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातपुडा (जि.नंदुरबार) येथील अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत**

**(७) * ५८१८० श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुड्यातील अतिदुर्गम भागातील (जि.नंदुरबार) विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राज्य शासनाने खास एकमेव सर्व सोयीयुक्त तोरणमाळ येथे आंतरराष्ट्रीय शाळा सुरू केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेत गणित आणि विज्ञानाचे शिक्षक नसल्याने दहावीच्या मुलांनाही जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक शिकवित असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहावी ते आठवीसाठी १४ पदवीधर शिक्षक, नववी ते दहावीसाठी ८ पदवीधर विषय शिक्षक आणि कला, क्रीडा, कार्यानुभव शिक्षक अशा २८ शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तोरणमाळ आंतरराष्ट्रीय शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरणे तसेच मूलभूत सोयी सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, खरे आहे.
(२ ) व (३) अंशत: खरे आहे
(४) २१ शिक्षकांच्या नेमणुका बाह्य संस्थेमार्फत करणेबाबत सन २०२३-२४ या वर्षासाठी समग्र शिक्षा अंतर्गत केंद्र शासनास प्रस्तावित करण्यात येत आहे.
विद्यार्थ्यांकरिता सर्व मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध आहे, तसेच विद्यार्थी संख्ये निहाय भौतिक सुविधाकरिता आवर्ती व अनावर्ती निधी उपलब्ध करून दिला जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) शहरात अपघातांच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(८) * ५८९६१ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-आग्रा महामार्गावरील मालेगांव (जि.नाशिक) शहरात अपघातांचे प्रमाण वाढत असून महामार्ग पोलिस केंद्राच्या मालेगाव हद्दीत अपघातांचे धोकादायक ब्लॅक स्पॅाट असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१ मध्ये ५४१ अपघात होऊन त्यात ३२१ व्यक्तींचा मृत्यू झाला असून सन २०२२ मध्ये ४८४ अपघात होऊन त्यात २८९ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोकादायक ब्लॅक स्पॅाटची शासनाने पाहणी करुन याबाबत कोणत्या ठोस उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) नाही. सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित आहे.
(२) मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर महामार्ग पोलीस केंद्र मालेगाव हद्दीत सन २०२१ मध्ये एकूण ४० अपघात झाले असून त्यात १८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. तसेच सन २०२२ मध्ये एकूण २६ अपघात होऊन ८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.
(३) मुंबई-आग्रा महामार्गावरील मालेगांव (जि.नाशिक) येथे महामार्ग पोलिस केंद्राच्या मालेगाव हद्दीत ब्लॅक स्पॅाट नसले तरी ज्या ठिकाणी अपघात होत आहेत त्या ठिकाणी दीर्घकालीन उपाययोजना म्हणून मालेगावच्या हद्दीत ३ उड्डाणपुलांना तात्विक मंजूरी मिळाली आहे. याव्यतिरिक्त आवश्यक सूचना फलक, गतिरोधक, अत्याधुनिक रुग्णवाहिका, रोड पेट्रोलिंग व्हेईकल आणि क्रेन इ. सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील “विद्या इंग्लिश स्कूल” या शाळेने विद्यार्थ्यांना शिक्षा केल्याबाबत

**(९) * ५७२७१ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील “विद्या इंग्लिश” स्कूल येथील शाळेने फी भरली नाही म्हणून कडाक्याच्या थंडीत सुमारे ५० विद्यार्थ्यांना बाहेर बसवल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पालकांनी विचारणा केली असता शाळा व्यवस्थापनाने धमकीवजा टाळाटाळीची उत्तरे दिल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळा व्यवस्थापना विरुद्ध कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३) विद्यार्थ्यांना थंडीत बसवल्याची व व्यवस्थापनाने भेटण्यास टाळाटाळ केल्याची तक्रार पालकांनी केली होती परंतू याबाबत चौकशीत अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

थकीत फि बाबतच्या शाळेने पालकांना शाळेत बोलावले होते परंतू ज्यांचे पालक आले नाहीत त्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक कार्यालयात बोलावले होते, याबाबत शाळा व्यवस्थापनास समज देण्यात आली आहे तसेच फि वसुलीसाठी विद्यार्थ्यांना त्रास देणार नाही असे हमीपत्र शाळेने दिले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबई व कोल्हापूर येथे ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) * ५९६७० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात दुकानदार व विक्रेत्यांकडून शितपेये, मिठाई व भाजी विक्रेता तसेच किराणा सामान विकणाऱ्या अनेक विक्रेत्यांकडून मुळ किंमतीपेक्षा अधिक किंमतीत वस्तूंची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी गेले वर्षभरात शासनाच्या वैद्यमापन शास्त्र विभागाने केलेल्या कारवाईत सुमारे ३ कोटी ७५ लाख ८८ हजार ५०० रुपयांची दंड वसुली करण्यात आल्याचे दि.८.१.२०२३ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात विशेषत: कोल्हापूर येथे मोठ्या प्रमाणावर व्यापारी, दुकानदार व सहकारी व खाजगी साखर कारखाने यांचेकडील सदोष वजन काट्यामुळे नागरिकांचे नुकसान होत असून यावर वैद्यमापन विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात माहे फेब्रुवारी २०२३ अखेर पर्यंत शासनाच्या वैद्यमापन शास्त्र विभागास किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करुन दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) मुंबईसह राज्यात गेले वर्षभरात छापील किंमतीपेक्षा अधिक किंमतीत वस्तूंची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करणा-या तसेच वैध मापन शास्त्र, अधिनियम -२००९ व आवेष्टित वस्तू नियम, २०११ मधील विविध तरतूदीचा भंग करणा-या आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात आली असून रु.२,३१,१५,२०० /- एवढी रक्कम दंड स्वरुपात वसूल करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

वैध मापन शास्त्र विभागामार्फत जानेवारी २०२३ अखेर वैध मापन शास्त्र, अधिनियम, २००९ व आवेष्टित वस्तू नियम, २०११ च्या तरतूदी अन्वये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण ५१९ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून दोषी आस्थापनेवरती गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या खटल्यामध्ये रु. २,५१,७०० /- एवढे प्रशमन शुल्क वसूल करण्यात आले आहे.

(३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यात एप्रिल, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत एकूण २४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारींवर विहित कालावधीत कारवाई करुन प्रशमन शुल्क वसूल करण्यात आले आहे. तसेच संपूर्ण राज्यात एकूण २,८८५ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून प्रशमन शुल्क वसुल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व शिरुर (कासार) (जि.बीड) तालुक्यामध्ये पुरवठा विभागाकडून होत असलेल्या अनियमिततेबाबत

**(११)** * **५९३५४ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील एकूण स्वस्त भाव दुकानांपैकी बीड तालुक्यात एकूण ३४६ तसेच शिरुर तालुक्यात एकूण १११ स्वस्त भाव दुकाने असून यापैकी अनेक दुकानदार माल स्वस्त धान्य दुकानदारांकडे जाण्यापुर्वीच बीड तालुक्यातील पाच व शिरुर (कासार) तालुक्यातील एका गोदामातून काळया बाजारात विक्री करीत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश दुकाने दुसऱ्या दुकानाला जोडणे तसेच नुतनीकरण करताना कागदपत्रे न तपासता किंवा ऑनलाईन प्रणालीची शहानिशा न करता तसेच दर महिन्याच्या मालाचे वाटप निकषाप्रमाणे झाले आहे किंवा नाही हे न तपासता नियमबाह्यरित्या नुतनीकरण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२१-२२ मध्ये बीड तहसील कार्यालयातुन सुमारे ५ हजार शिधापत्रिका गहाळ झाल्याबाबतचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी वारंवार तसेच लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना कळवून कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) बीड जिल्ह्यातील बीड तालुक्यात ३४६ व शिरुर (कासार) तालुक्यात १११ रास्त भाव दुकाने आहेत, हे खरे आहे.

तथापि, यापैकी अनेक रास्त भाव दुकानदार धान्य रास्त भाव धान्य दुकानदारांकडे जाण्यापुर्वीच बीड तालुक्यातील पाच व शिरुर कासार तालुक्यातील एका गोदामातून काळया बाजारात विक्री करीत असल्याबाबत कोणतीही लेखी तक्रार जिल्हा पुरवठा कार्यालय, बीड येथे प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

रास्त भाव दुकानांचे प्राधिकारपत्र नुतनीकरणासाठी तालुका स्तरावरून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची शासन निर्णय, २.२.२००२ अन्वये नियमानुसार कार्यवाही केली जाते.

रास्त भाव दुकानदाराचा मृत्यू झाल्यास/रास्त भाव दुकान निलंबित/रद्द झाल्यास अशा दुकानास जोडण्यात आलेल्या शिधापत्रिकाधारकांना विहित वेळेत धान्य मिळावे व शिधापत्रिकाधारक धान्यापासून वंचित राहू नयेत व त्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून असे दुकान दुसऱ्या दुकानास जोडून पर्यायी व्यवस्था केली जाते.

(३) बीड तहसिल कार्यालयातून ५ हजार शिधापत्रिका गैर मार्गाने कार्यालयाबाहेर गेल्याची बाब निदर्शनास येताच सदर शिधापत्रिकांच्या आधारे अनुचित मार्गाने शासनाचे आर्थिक नुकसान होऊ नये, यादृष्टीने शिधापत्रिका जिल्हा पुरवठा कार्यालय, बीड यांच्या दि.२०.०७.२०२१ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच सदर शिधापत्रिका निदर्शनास आल्यास त्या जप्त करून जिल्हा पुरवठा कार्यालय, बीड यांना त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत बीड जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

मा. विधानसभा सदस्य, बीड यांचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजीचे पत्र विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे प्राप्त झाले असून या पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी अहवाल सादर करणेबाबत सूचित केल्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी दि.२०.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांना सविस्तर अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.२८.०२.२०२३ च्या पत्रान्वये उप आयुक्त (पुरवठा ), औरंगाबाद विभाग यांना जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर अहवाल सादर केला असून तपासणीअंती नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी दि.८.१२.२०२१ च्या पत्रान्वये जिल्हा पुरवठा कार्यालय, बीड मधील शिधापत्रिका अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव कार्यवाहीत असून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील डॉ.डी.एस अहिर शाळेत शालेय पोषण आहाराच्या खिचडीत अळया आढळून आल्याबाबत**

**(१२) * ५७४१५ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील डॉ.डी.एस अहिर शाळेत विद्यार्थ्यांसाठी पोषण आहाराअंतर्गत शिजवण्यात आलेल्या खिचडीत अळया आढळून आल्याचे दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी दुर्लक्ष केल्याने सदर तक्रार नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

डॉ. डी.एस.अहिर प्राथमिक शाळेत दि. ०२ जुलै, २०२२ रोजी शालेय पोषण आहाराच्या खिचडीत अळया आढळून आल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) संबंधित शिक्षणाधिकारी यांनी सदर शाळेतील आहार पुरवठेदार श्री. स्वामी समर्थ स्वयंरोजगार महिला सहकारी सेवा संस्था मर्या. नाशिक या संस्थेकडून पोषण आहाराचे कामकाज काढून त्याजागी अन्य बचत गटाची नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक ठिकाणी शालेय सहलींच्या बसेसना झालेले अपघात

**(१३) * ५७४९९ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शाळांच्या सहलीच्या बसला वेगवेगळया ठिकाणी अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरघाट येथे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अपघातात नियमांचे उल्लंघन करुन मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी बसवण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच, बारामती येथे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अपघातात इचलकरंजी येथील २४ मुली जखमी झाल्या तर औरंगाबाद पुणे महामार्गावर माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान सहलीच्या बसला अपघात होऊन चार विद्यार्थी गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(४) तसेच डोंबिवली येथील विद्यार्थ्यांच्या बसला जुन्या पुणे मुंबई महामार्गावर माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान गंभीर अपघात होऊन ६४ विद्यार्थ्यांचे प्राण धोक्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकरणांवर आळा घालण्यासाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी पूर्वपरवानगी घेणे तसेच निश्चित नियमावली तयार करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.
सदर वाहनामध्ये तांत्रिक बिघाड झाला होता.
(५) शालेय सहलीच्या आयोजनामध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षा विषयक काळजी घेण्याबाबत वेळोवेळी आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोदर्डे (ता.पारोळा, जि.जळगाव) शिवारात धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(१४) * ६०६२४ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोदर्डे शिवारात (ता.पारोळा, जि.जळगाव) काळया बाजारात विकले जाणारे लाखो रुपयांचे रेशनिंगचे धान्य जिल्हाधिकारी यांनी टाकलेल्या धाडीमध्ये जप्त करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने काळाबाजार करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि. २४/१२/२०२२ रोजी बोदर्डे शिवार, ता. पारोळा येथील खाजगी गोदामात टाकलेल्या धाडीमध्ये आढळून आलेला धान्यसाठा हा रेशनिंगचा नसल्याचे आढळून आल्याने जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील अनधिकृत शाळांबाबत**

**(१५) * ५८६५४ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात एकूण १४३ अनधिकृत शाळांपैकी १६ शाळा तपासणीअंती बंद करण्यात आल्या असून ११ शाळांना मान्यता देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १४३ अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर यांनी दिनांक ०७ मार्च २०२२ रोजी वा त्यासुमारास पालघर जिल्ह्याच्या ८ तालुक्याच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम १८ चा भंग करणाऱ्या पालघर जिल्ह्यातील १४३ अनधिकृत शाळा बंद करणे, संस्था चालकांकडून द्रव्यदंडाची रक्कम वसूल करून संबंधितांवर भारतीय दंड संहिता कलम ४२०, १८८ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी पोलीस अधीक्षक, पालघर आणि पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर वसई-विरार यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळांवर कारवाई करण्याची प्रक्रिया संथ गतीने होत असल्याची लेखी तक्रार विरार येथील एका पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रश्न २, ३ व ४ च्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संस्था चालकावर गुन्हे दाखल करणे, द्रव्यदंडाची वसुली करणे व अनधिकृत शाळा बंद करणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) २२ अनधिकृत शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच, अनधिकृत शाळांना द्रव्यदंडाचा भरणा करण्याबाबत नोटिस देण्यात आल्या असून सदर शाळांमध्ये प्रवेश न घेणेबाबत वर्तमानपत्र व इतर माध्यमातून पालकांना आवाहन करण्यात आले आहे. तसेच, वसई तालुक्यात सर्वाधिक अनधिकृत शाळा असल्याने संबंधित शाळांवर दिलेल्या निर्देशानुसार योग्य ती कारवाई न केल्याने तत्कालीन गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसई यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदगाव (ता.मुरूड, जि.रायगड) येथील रास्तभाव दुकानातून निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप होत असल्याबाबत**

**(१६) * ५९२८६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (ता.मुरूड, जि.रायगड) ग्रामपंचायती जवळ असणाऱ्या रास्त भाव रेशन दुकानातून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत मोफत वाटप केलेले धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रास्त भाव दुकानातून मोफत वाटप करण्यात आलेला तांदुळ निकृष्ट दर्जाचा व आरोग्याला घातक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचा तांदूळ वाटप करणाऱ्या रास्तभाव धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) मौजे नांदगांव, ता. मुरुड, जिल्हा- रायगड येथील रास्तभाव दुकानातून निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य वितरीत होत असल्याबाबत दि. २३.१.२०२३ रोजी ई-मेल द्वारे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी पथकाद्वारे केलेल्या तपासणीत सदर अन्नधान्य योग्य प्रतीचे असल्याचे आढळून आले. संबंधित रास्तभाव दुकानाशी संलग्न असलेल्या शिधापत्रिका धारकांपैकी १९३ शिधापत्रिकाधारकाधारकांच्या गृहभेटी घेतल्या असता त्यांनी प्रत्येक महिन्यात योग्य दर्जाचे अन्न धान्य प्राप्त होत असल्याचे तसेच अन्नधान्य वाटप व अन्नधान्याचा दर्जा याबाबत दुकानदाराविरुद्ध कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी जबाब दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागात शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती खालावली असल्याबाबत**

**(१७) * ५८४८५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रथम एज्युकेशन फाउंडेशन या संस्थेने केलेल्या ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट (असर) सर्वेक्षणातून राज्यातील ग्रामीण भागात शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती खालावली असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करोनापूर्व शैक्षणिक वर्षापूर्वीच्या तुलनेत शाळांमधील पायाभूत सुविधांची उपलब्धता ही कमी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगांव जिल्हयातील इयत्ता तिसरी ते पाचवीच्या २२ टक्केच मुलांना वाचता येत असुन ८० टक्के मुलांना वजाबाकी देखील करता येत नसुन इयत्ता पाचवी ते आठवीच्या ४५ टक्के विद्यार्थ्याची मराठी व इंग्रजी वाचन क्षमता कमी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता सुधारण्याकरिता राज्यात विशेषतः ग्रामीण भागात समग्र शिक्षण योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे आहे.
(४) राज्यात विशेषतः ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता सुधारण्याकरिता मागील इयत्तेच्या महत्वाच्या अध्ययन निष्पती प्राप्त होण्यासाठी:-

१. इयत्ता दुसरी ते दहावी साठी सेतु अभ्यास राबविण्यात आला आहे.
२. इयत्ता पहिली ते पाचवी भाषा व गणित विषयासाठी कार्यपुस्तिका, छापील पुरक अध्ययन साहित्य तयार करण्यात आले आहे.
३. निपुण भारत अध्ययन अभ्यास सर्वेक्षणामुळे शिक्षकांना अध्ययन निष्पती निहाय कृती आराखडा तयार करणे शक्य झाले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**मुंबई ते अहमदाबाद (जि.पालघर) या राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांबाबत**

**(१८) * ५७४११ श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ते अहमदाबाद (जि.पालघर) या राष्ट्रीय महामार्गावरील कोपर उड्‌डान पुल, पेल्हार, चिंचोटी, बापाणे फाटा, मालजीपाडा व ससूनवघर येथील खड्‌डे तसेच अतिक्रमणामुळे गत सात महिन्यांमध्ये १७७ पेक्षा जास्त अपघात होऊन ६२ जणांचा मृत्यु व १९२ जण गंभीर जखमी झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराचा बेजबाबदारपणा तसेच रस्त्याची देखभाल दुरुस्ती न होणे व विविध ठिकाणी करण्यात आलेली अतिक्रमणे अपघातास कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.
चिंचोटी पोलीस ठाण्यातून मिळालेल्या गेल्या ७ महिन्यांच्या अपघातांच्या आकडेवारीनुसार, १०८ अपघात झाले आहेत ज्यात ४८ मृत्यू आणि ६३ जखमी झाले आहेत.
(२) महामार्गावरील अपघात हे प्रामुख्याने अतिवेगाने वाहन चालवणे, मद्यपान करून वाहन चालवणे, रॅश ड्रायव्हिंग करणे, वाहतुकीचे नियम न पाळणे, मोबाईल फोनचा वापर इ.कारणांमुळे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
कंत्राटदाराकडून महामार्गाची नित्यनियमाने देखभाल केली जाते.
(३) सन २०२२ मध्ये पावसाळयात अतिवृष्टीमुळे महामार्गावर खड्‌डे पडले होते. त्या दरम्यान तात्काळ सदर खड्‌डे भरण्यात आले व पावसाळयानंतर डांबरीकरणाने दुरुस्ती करण्यात आली. सद्यस्थितीत महामार्गाची देखभाल नियमितपणे केली जात असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.
महामार्गावर कोणतेही मोठे अतिक्रमण नाहीत आणि मुख्य कॅरेजवे आणि सर्व्हिस रोड वाहतुकीसाठी मोकळा असून कोणतेही अतिक्रमण झाल्यास वेळोवेळी काढले जाते.
महामार्गावर विविध ठिकाणी गतिरोधक, सुचना फलक,वेग मर्यादा फलक इ. आवश्यक सुरक्षा उपाययोजना केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गरीब व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के राखीव जागा न ठेवणाऱ्या शाळांवर गस्ती पथकामार्फत कारवाई करणेबाबत**

**(१९) * ५७११६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत शाळांमध्ये २५ टक्के जागा गरीब व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक असताना गत पाच वर्षातील २९० शाळांमध्ये आरटीई कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध शिक्षण संस्थांकडून आरक्षित असलेल्या २५% जागांवर प्रवेश देण्याची प्रक्रिया माहे जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत राबविण्यात आली नसून यासाठी उघडण्यात आलेले ऑनलाईन पोर्टल सुध्दा बंद होते, हे ही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण अधिकारी यांनी खाजगी शाळांच्या व्यवस्थापनाबरोबर आर्थिक संगनमत करुन २९० शाळांपैकी अद्याप एकाही शाळेवर कायदेशीर कारवाई केली नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०२३-२४ या वर्षासाठीचे आरटीई ऑनलाईन पोर्टल नुकतेच सुरू करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माणगांव (जि.रायगड) येथे धान खरेदी सुरु करून केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत**

**(२०) * ६०५८३ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगांव (जि.रायगड) येथिल धान खरेदी केंद्राची सन २०२२-२३ साठीची खरेदी बंद करण्यात आल्याची बाब जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माणगांव केंद्राच्या धान खरेदीची मर्यादा २७४०० क्विंटल एवढीच असून अद्याप साधारणत: ४०० शेतकऱ्यांकडे जवळपास १३००० क्विंटल धान शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील माणगावसह अनेक भात खरेदी केंद्रावर माहे डिसेंबर, २०२२ पासून खरेदी होवूनही अद्याप शेतकऱ्यांच्या धानाची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी शेतकऱ्यांच्या नोंदी वाढल्याने खरेदीत देखील वाढ होण्याची शक्यता असताना खरेदी केंद्राची संख्या देखील वाढविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान खरेदी सुरु करुन केंद्रांची संख्या वाढवून धानाच्या रकमेचे प्रदान सत्वर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

माणगांव केंद्रासाठी २७४०० क्वि. धान खरेदी उद्दिष्ट देण्यात आले आहे. माणगाव खरेदी केंद्रावर ११४७ शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली असून, दि.०१.०३.२०२३ पर्यंत नोंदणी झालेल्या ९७१ शेतकऱ्यांकडून २५४७०.३७ क्वि. धानाची खरेदी झाली आहे.

चालू खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये उद्दिष्टाच्या मर्यादेत धान खरेदीसाठी दि.०८.०३.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यात दि.०१.०३.२०२३ पर्यंत खरेदी केलेल्या धानाच्या रु.११४.६९ कोटी चुकाऱ्यांपैकी रु.८७.०५ कोटी रकमेचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. तसेच माणगाव खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या रु.५.१९ कोटी चुकाऱ्यांपैकी रु.४.२६ कोटी रक्कमचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) धान खरेदी केंद्र संख्या वाढवून देणेबाबत लोकप्रतिनिधी/शेतकरी यांच्याकडून पणन महासंघास कोणतीही मागणी प्राप्त झाली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औषधशास्त्र विभागाच्या प्रथम वर्ष परीक्षेच्या फार्मास्युटीकल केमिस्ट्री या विषयाची प्रश्नपत्रिका परीक्षेपुर्वीच सोशल मिडीयावर उघड झाल्याबाबत

**(२१) * ५७५३२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औषध निर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षीच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचे बुधवार दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नपत्रिका फुटल्याचे कळल्यानंतर तंत्रशिक्षण मंडळाच्या उपसचिवांनी वेदांतनगर पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

हिवाळी परीक्षा २०२२ च्या औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या फार्मास्युटीकल केमिस्ट्री (पेपर कोड-२०११२) या विषयाची दि.११.०१.२०२३ रोजीची प्रश्नपत्रिका उघड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) प्रश्नपत्रिका उघड झाल्याबाबत उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी दि. ११.०१.२०२३ रोजी वेदांतनगर पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे तक्रार केली असुन या तक्रारीच्या अनुषंगाने वेदांतनगर पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांचेकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(२२) * ५८२८८ श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीपासून मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील शैक्षणिक वर्ष २०२१- २०२२ मधील १८ हजार ९०२ विद्यार्थी वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिष्यवृत्तीपासून मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी वंचित असल्याने शैक्षणिक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर शिष्यवृत्तीबाबत निधीची तरतूद करुन,वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विशिष्ट जाती/प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जात नाही.

या विभागाद्वारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकाचा देखील समावेश आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखाली उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एकूण ३,९१,१९८ इतके अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३,८१,०६२ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून, १०,१३६ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करणे बाकी आहे. त्यासाठी निधी वितरीत करण्यात आला असून, शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## परशुराम (ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) घाटात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम करतांना झालेल्या दुर्घटनांबाबत

**(२३) * ५८३५४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परशुराम (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) घाटात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ताच्या चौपदरीकरणाचे काम सुरू असताना माहे जुलै, २०२१ आणि माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये झालेल्या दुर्घटनांप्रकरणी केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर कामावर देखरेख करण्याकरिता नेमण्यात आलेल्या स्वतंत्र अभियंता व कंत्राटदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच घाटातून वाहतूक सुरू असताना मोठमोठे दगड वारंवार रस्त्यावर येत असल्याने व दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घाटाच्या पायथ्याशी असलेल्या मौजे पेढे गावातील घरांवर दगड कोसळून हानी झाल्याने ग्रामस्थ व वाहनचालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, घाटातील डोंगर खोदण्याचे काम करताना मक्तेदाराने सुरक्षिततेची कोणतीही उपाययोजना न केल्याने आणि संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याने वारंवार अशा घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ मधील नोटीसच्या अनुषंगाने खुलासा प्राप्त झाला आहे काय, त्यात कोणती कारणे नमूद करण्यात आली आहेत आणि त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

सदर परशुराम घाटात दि.७ जानेवारी, २०२३ रोजी कंत्राटदारामार्फत शेवटच्या ३० मी.अंतरामधील अवघड भागात काम करीत असताना पोकलेन द्वारे खोदकाम केलेला मलबा डंप करताना दगड अनपेक्षीतपणे दरीबाजूस कोसळला होता.
(३) हे खरे नाही.

सदर ठिकाणी कंत्राटदारामार्फत संरक्षक भिंतीचे काम केल्यामुळे दरीच्या बाजुस असणारी गावे सुरक्षित झालेली आहेत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. संबंधित कोणत्याही प्रकारची दुर्घटना होणार नाही यास्तव दक्षता घेणेबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) सदर नोटीसीबाबत कंत्राटदाराकडून खुलासा करण्यात आला आहे की, "कंत्राटदारामार्फत परशुराम घाटातील चौपादरीकरणाच्या कामादरम्यान करारनाम्यानुसार आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. दि. ०८ फेब्रुवारी, २०२२ रोजी घडलेली दरड कोसळण्याची घटना ही अनपेक्षीत अपघात होता. सदर घटनेत अपघातग्रस्त मृत व्यक्तीस, कामगारासाठी असलेल्या गट विमा योजनेमधून त्याच्या कुंटबीयांना नुकसान भरपाई अदा करण्यात येणार आहे". सद्यस्थितीत कंत्राटदाराने कळविल्यानुसार संबंधित मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना गट विमा योजनेतंर्गत नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

तसेच केंद्र सरकारमार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता यांनी याबाबत खुलासा केला आहे की,"रस्ते सुरक्षा उपाययोजनांर्गत त्यांनी वेळोवेळी कंत्राटदारास सदर बाबत सुचना देऊन परशुराम घाटामध्ये आवश्यक त्या सुरक्षा उपायोजना अवलंबून काम करणेबाबत कळविले होते."

वरील खुलासा प्राप्त झाले नंतर राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत कंत्राटदाराच्या देयकामधून दंडात्मक कार्यवाहीसाठी सुमारे रु. २० लक्ष व स्वंतत्र अभियंता यांचे देयकामधून सुमारे रु. ०५ लक्ष रोखून ठेवण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावरोली डोंगरीपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेचा झालेला अपहार**

**(२४) * ६१८५१ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सावरोली डोंगरीपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची सन २०१८ ते २०२२ या चार वर्षाची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा न करता शाळेतील शिक्षकानेच रक्कमेचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्याच्या पालकांनी तलासरी पंचायत समितीच्या शिक्षण विभागात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित शिक्षकावर कारवाई करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय. सदर प्रकरणी श्री.रमेश पटारा, मुख्याध्यापक यांना दिनांक ३१.१.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. अपहार केलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमा श्री.पटारा यांच्याकडून वसूल करुन विद्यार्थ्यांना देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**नवी मुंबई ऐरोली येथे करण्यात आलेल्या कालबाहय दुध विक्री बाबत**

**(२५) * ५६५६२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील रिलायन्स मॉल मधून मुदत संपलेल्या दुधाची विक्री होत असल्याचे दिनांक ०५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास एका सतर्क नागरीकाकडून रबाळे एमआयडीसी पोलीसांच्या निदर्शनास आणण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
नवी मुंबई येथील रिलायन्स मॉल मधून मुदत संपलेल्या दुधाची विक्री होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा र.न.क्र. ०६/२०२३ भारतीय दंड संहिता कलम २७२, २७३, ४२०,३४ आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ कलम ३(१)(ग), २६, २७, ५९ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खरोळा फाटा ते पानगाव (ता. रेणापूर, जि.लातूर) रस्त्याच्या प्रलंबित कामाबाबत**

**(२६) * ५९२९४ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरोळा फाटा ते पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गाच्या (क्र. ३६१ एच) दुरुस्तीचा प्रस्ताव अनेकवेळा शासनास पाठवुनही त्याला अद्यापपर्यंत मंजुरी मिळाली नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, सदर रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात होऊन अनेक नागरीकांचे मृत्यू झाले असून वाहनचालकांची गैरसोय होत असल्याने या रस्त्याचे प्रलंबित काम तात्काळ सुरु करण्याच्या मागणीसाठी पानगाव व परिसरातील नागरिकांनी गावबंद आंदोलन तसेच पिंपळफाटा (ता.रेणापूर) येथील राष्ट्रीय महामार्गावर (क्र.५४८ बी) दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत   ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.

सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन निविदा स्वीकृती प्रस्ताव केंद्र शासनाचे प्रादेशिक अधिकारी,रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, मुंबई यांना दि.१३.०९.२०२२ रोजी मंजुरीसाठी सादर केलेला असून दि.२७.१२.२०२२ रोजी उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन त्यांना अहवाल सादर करण्यात आला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत राखण्यात आला आहे.दिनांक २६.१२.२०२२ रोजी पानगाव परिसरातील नागरिकांमार्फत आंदोलन करण्यात आले होते.
(३) लातूर- रेणापुर रा.म.क्र.५४८ बी व रेणापुर ते पानगाव रा.म.क्र. ३६१ एच या कामातील खरोळा पाटी ते पानगाव १४.२ कि.मी. या कामाचे नवीन अंदाजपत्रक किंमत ८२.८९ कोटी, दिनांक २८.१२.२०२१ रोजी केंद्र शासनाचे प्रादेशिक अधिकारी,रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. सदरील कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून निविदा स्वीकृती प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर रस्त्याचे नवीन काम सुरु करण्यात येईल. सद्यस्थितीत सदर रस्ता खड्डे भरुन वाहतुकीसाठी सुस्थितीत राखण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वस्त भाव दुकानामधील ई-पॉस मशीन बंद पडत असल्याने धान्य वितरणास अडचणी निर्माण होत असल्याबाबत

**(२७) * ६०५८१  श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या स्वस्त भाव दुकानामधील धान्य वाटपात होणारा गैरव्यवहार टाळणे तसेच वितरण व्यवस्था अधिक सक्षम व बळकट करण्यासाठी शासनाने दिल्ली येथील कंपनीकडून सन २०१७ मध्ये ई-पॉस मशीन खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी या ई-पॉस मशिनमध्ये तांत्रिक बिघाड होणे, सर्व्हर डाऊन, नेटवर्क नसणे, प्रमाणिकरणासाठी अंगठ्याचे ठसे न मिळणे, मशीन कालबाह्य होणे इत्यादी अनेक कारणास्तव शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरण करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्तभाव धान्य दुकानामधील कालबाहय झालेले  ई-पॉस मशीन बदलून नवीन मशीन उपलब्ध करणे तसेच लाभार्थ्यांना नियमित धान्य पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सक्षम व बळकट करण्यासाठी लाभार्थ्यांची बायोमॅट्रीक ओळख पटवून ई-पॉस उपकरणाद्वारे शिधावस्तू वितरण करण्याचा निर्णय सन २०१८ मध्ये घेण्यात आला असून त्यानुसार रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ सिस्टीम इंटिग्रेटरची निवड करण्यात येऊन त्यांच्यामार्फत राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस उपकरणे बसविण्यात आली आहेत.

(२) माहे जानेवारी, २०२३ मध्ये सर्व्हरबाबत अडथळा आढळून आलेला नाही. तथापि, माहे ऑक्टोबर, २०२२ व नोव्हेंबर, २०२२ मध्ये काही कालावधीसाठी सर्व्हर, नेटवर्क मधील तांत्रिक अडचणीमुळे आणि सदर कालावधीत भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांचेकडील आधार सर्व्हरमध्ये काही कालावधीकरीता तांत्रिक अडचणी उद्भवल्याने अन्नधान्य वितरणात काही प्रमाणात अडचणी आल्या होत्या. तथापि सद्यस्थितीत एईपीडीएस प्रणाली सुरळीतपणे चालू आहे.

(३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानांमध्ये नवीन ई-पॉस उपकरणे बसविण्याकरीता दि.०१.०७.२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ सिस्टीम इंटिग्रेटरची निवड करण्यात आली असून त्यांना कार्यादेश देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार ४जी व आयरिस स्कॅनर हे तंत्रज्ञान असणाऱ्या मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील रेशन दुकानांना शासकीय धान्य पोहोचविण्याचे कंत्राट दिलेली कंपनी अनियमितता करीत असल्याबाबत

**(२८) * ६०८८२ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील रेशन दुकानांना शासकीय धान्य पोहोचविण्याचे कंत्राट यवतमाळ येथील सिव्हर रोड लाईन्स ट्रान्सपोर्ट या कंपनीला शासनाने दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षापासुन सदर कंत्राटदार पुरवठा अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अनियमितता व धान्य वाटपास विलंब करीत असल्याने लाभार्थी धान्यापासून वंचित रहात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने वाहतूक जिल्हा पुरवठा कंत्राटदार तसेच संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील गुलजार नगर विस्डम ॲकेडेमी इंग्लीश स्कुलमध्ये केलेली फी वाढ

**(२९) *६१४५५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :**सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, जि.ठाणे येथील गुलजार नगर विस्डम ॲकेडेमी इंग्लीश स्कुलमध्ये मागील तीन वर्षापासून शाळेने वाढीव फी आकारल्याने महानगरपालिका जि.प. शिक्षण विभाग व शिक्षण उपसंचालक यांच्याकडे शाळेच्या फी वाढीसंदर्भात तक्रार केली असता शाळेच्या व्यवस्थापन सचिवांनी सहा विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकल्याचे दिनांक ३० डिसेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळेच्या व्यवस्थापना विरोधात शिक्षा सुधार समितीच्यावतीने भिवंडी पालिका मुख्यालयासमोर "मेरी पाठ शाला" हे आंदोलन सुरु केले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या व्यवस्थापनेविरुध्द कारवाई करुन सहा विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत प्रवेश देणेबाबत व शाळेतील ८५० विद्यार्थ्यांकडून योग्य दरात फी शुल्क आकारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत खरे आहे.

गुलजार नगर विस्डम ॲकेडेमी इंग्लीश या शाळेतून ६ विद्यार्थ्यांना काढून टाकण्यात आले आहे.अशी तक्रार शिक्षा सुधार समिती यांनी दिनांक २१/१२/२०२२ रोजी केली होती.

(२) होय

(३) संबधित विद्यार्थ्यांना काढून न टाकता प्रवेश देण्याच्या सूचना महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने दिल्या होत्या, त्यावरही शाळेने प्रतिसाद न दिल्याने शाळेची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील शाळेतील पोषण आहाराअंतर्गत कमी धान्याचे वाटप करण्यात येत असल्याबाबत

**(३०) * ६०८९० श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील शाळेत प्रत्येक महिन्याला शालेय पोषण आहाराअंतर्गत तांदूळ, डाळ व इतर वस्तुचे वितरण करतांना आवश्यकतेपेक्षा कमी माल दिला जात असल्यांचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराकडून शाळेसाठी मंजूर धान्याची परस्पर विक्री करण्यात येऊन शाळेला मंजूर कोटयापेक्षा कमी धान्य देण्यात येत असल्याने शालेय पोषण आहार योजनेची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जूनगाव ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर येथील मॉडेल स्कूल असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारात मोठया प्रमाणात अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे.

संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी केलेल्या चौकशीत जूनगाव ता.पोंभुर्णी, जि.चंद्रपुर येथील जिल्हा परिषद शाळेच्या पोषण आहार साठा नोंदवहीमध्ये शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये तफावत दिसून आली. त्यानुसार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकावर शासनाच्या प्रचलित नियमान्वये कारणे दाखवा नोटीस बजावून एक वेतनवाढ एक वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.